# प्रेस नोट ता. २३/०७/२०१९

## दुचाकी गाडी चोरी करणाऱ्या आरोपीस हडपसर पोलीसांकडुन अटक

हडपसर पोलीस स्टेशन हददीत वाहनचोरीच्या गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलींग संदर्भात मा. वरिष्ठांचे आदेशान्वये तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी असे हडपसर पोलीस स्टेशनच्या हददीत गुन्हे प्रतिबंधक पेट्रोलिंग करीत असताना फिरत फिरत १५ नंबर पुणे सोलापूर हायवे रोडवर हडपसर पुणे येथे वाहन चेकींग करीत थांबले असताना एक मोटार सायकलवर एक इसम पुण्याकडून जोरात येत असताना दिसल्याने त्यास थांबण्याचा इशारा केला असता तो न थांबता पळुन जावु लागला. तेव्हा त्याचा पाठलाग करुन थोडयाच अंतरावर मोटार सायकलसह पकडून, त्याला त्याचा नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव बालाजी विलास गोळवे वय २० वर्षे रा. महादेवनगर, किर्लोस्कर सोसायटीत पांढरे यांच्या रुममध्ये, मांजरी रोड हडपसर पुणे मुळगाव गळवेवाडी ता. सांगोला, जि. सोलापूर असे असल्याचे सांगितले. तेंव्हा त्यास पळुन जाण्याचे कारण विचारले असता तो उडवाउडवीचे उत्तरे देवु लागला तेंव्हा त्याचेकडे असलेला होंडा ॲक्टीव्हा मोपेड नं. एम. एच. १२ एम एस ४०७२ हिचे कागदपत्रांबाबत विचारपुस केली असता त्याने सदरची मोटार सायकल ही महादेव नगर हडपसर पुणे येथून चोरल्याचे सांगत असल्याने त्याचेकडे असलेल्या मोटार सायकलच्या आर.टि.ओ. नंबर, चॅसि नंबर व इंजिन नंबर वरुन हडपसर पोलीस स्टेशनकडील क्राईम रजिस्टरची पडताळणी केली असता. सदरच्या होंडा ॲक्टीव्हा मोपेड नं. एम.एच. १२ एम.एस. ४०७२ बाबत हडपसर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं. ६७७/२०१९ भादविक ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दाखल गुन्हयात दिनांक २२/०७/२०१९ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. सुनिल फुलारी, अप्पर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग पुणे व मा. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ५ पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस निरीक्षक हमराज कुंभार यांचे सुचनानुसार सहा. पोलीस निरीक्षक संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक तुषार पाचपुते, पो.हवा. ८२३ युसुफ पठाण, पो.हवा. ३८६८ सपंत औचरे, पो.हवा. ५५६२ राजेश नवले, पो.ना. २८०० प्रताप गायकवाड, पो.ना. ६४८९ विनोद शिवले, पो.ना. ६८७० सैदोबा भोजराव, पो.ना. ५८५३ गणेश दळवी, पो.शि. १०१५ अनिल कुसाळकर, पो. शि. ८६९२ अकबर शेख, पो. शि. ७५१२ गोविंद चिवळे, पो.शि. ७६८४ शंशिकांत नाळे, पो.शि. ८३७६ अमित कांबळे, पो.शि. ८७६१ ज्ञानेश्वर चित्ते यांनी केली आहे.